लोकमत



# वाट चुकलेल्या मूकबधीर मुलाला केले शिक्षकाच्या स्वाधीन

## वरोरा येथील महिला पोलिसांची कामगिरी प्रेरणादायी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वरोरा :** वाट चुकलेला शाळकरी मुलगा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला. नंतर तो काहीच बोलत नसल्याने पोलिसांसमोर यक्ष प्रश्न पडला. शेवटी पोलीस मित्राच्या मदतीने त्याला शाळेतील शिक्षकांच्या स्वाधीन करण्यात आले. ही घटना शुक्रवारी सकाळी घडली. मुकबधीर मुलाचे नाव जितेंद्र आदित्य परचाके (७) असे आहे. या प्रकरणात पोलिसांनी दाखविलेल्या प्रसंगावधानाची सर्वत्र स्तुती करण्यात येत आहे.

अधिक माहिती नुसार बाहेर गावातून शिक्षणासाठी आनंदवनातील मुकबधीर शाळेत नुकताच दाखल झालेला सात वर्षीय मुलगा शाळेची वाट चुकून वरोरा शहरातील रत्नमाला चौकात आला. ओळखीचे कुणीच दिसत नसल्यामुळे भांबावून गेलेला मुलगा अचानक रडू लागला. त्याचे रडणे एकून आजूबाजूच्या लोकांनी त्याची विचारपूस केली असता तो काही बोलत नव्हता. शेवटी तेथील काही नागरिकांनी आपले कर्तव्य बजावत त्याला वरोरा पोलीस स्टेशनमध्ये आणून सोडले. पोलीस शिपाई ममता गेडाम व प्रिती बावणे यांनी त्या मुलाची विचारपूस केली असता तो काही बोलत नव्हता. मुलगा घाबरल्यामुळे बोलण्याच्या मन:स्थितीत नाही, हे कळल्यावर ज्या जागेवर तो गवसला, त्या जागेच्या आसपास त्याचे घर असावे, असे गृहित धरुन महिला पोलीस शिपायांनी पोलीस मित्र लखन केशवानी याला बोलावून घेतले. पोलीस मित्राच्या सहाय्याने मुलाला घेऊन ते रत्नमाला चौकात गेले. त्या ठिकाणी मुलाच्या परिचयाचे कोणी नसल्याने आनंदवन चौक व मार्केटमध्ये फिरवून पत्ता लावण्याचा प्रयत्न केला. जेणेकरुन त्याला त्याच्या ओळखीचे नातेवाईक किंवा परिचीत भेटेल अथवा तो राहत असलेले ठिकाण सांगेन. परंतु केवळ हावभाव करीत असल्यामुळे जितेंद मुका असल्याचे लक्षात आले. तेव्हा व्हॉट्सअ‍ॅपवर मुलाचा फोटो टाकण्यात आला. जितेंद्रला बोलता येत नसल्याने तो आनंदवन येथे असलेल्या मुकबधिर मुलांच्या शाळेतील असावा, असे पोलिसांना वाटले. वेळ न दवडता पोलीस आणि पोलीस मित्र हे मुलाला घेऊन आनंदवनातील मूकबधिर शाळेत गेले. तिथे शिक्षकांना भेटल्यानंतर तो मुलगा मूकबधिर शाळेचाच असल्याचे निष्पन्न झाले. जितेंद्र परचाके हा नुकताच तीन-चार दिवसांपूर्वी आनंदवनात शिकण्यासाठी दाखल झालेला आहे, हे विशेष.